# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,    Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.-    दिनांक.०९.०४.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २५.०३.२०२०.

२) मा. गृहसचिव, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडी अ.शा.पत्र क्रं. 40-3/2020-DM-I(A) दि. 3 एप्रिल 2020

**विषयः- लॉकडाऊनच्या कालावधीत शेती अनुषंगीक कामे सुरळीत पार पाडणे बाबत.**

## आदेश

मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भीय आदेशान्वये नांदेड जिल्हयात दिनांक ३१ मार्च २०२० रोजी पासून ते दि.१४.०४.२०२० चे २४.०० वा. पर्यंत जमावबंदी आदेश लागू करीत असून या कालावधीत (५) पाच व त्या पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास प्रतिबंध निर्गमित करण्यात आले आहे, त्यामध्ये जीवनावश्यक वस्तू / अत्यावश्यक सेवा प्रतिबंधामधून वगळण्यात आले आहे. तथापि संदर्भ क्रं. २ अन्वये मा. गृहसचिव, भारत सरकार नवी दिल्ली यांनी सर्व राज्याचे मुख्य सचिव यांना उद्देशुन दिलेल्या अर्धशासकीय पत्रात नमुद केले नुसार लॉकडाऊनच्या कालावधीत कृषी विषयक कामांना ग्रामीण भागात सुट देण्यात आलेली आहे. तथापि क्षेत्रिय स्तरावर या बाबीकडे पुरेसे लक्ष दिल्याचे दिसुन येत नसल्याचे नमुद करुन याबाबत सर्व संबंधीतांना सूचित करावे असे निर्देशीत केलेले आहे.

त्यानुषंगाने मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मी डॉ. विपीन इटणकर, जिल्हाधिकारी नांदेड तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड याव्दारे लॉकडाऊनच्या कालावधीत शेती अनुषंगीक खालील कामे सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टिने खालील कामांना प्रतिबंधीत यादीतुन वगळण्याचे आदेशीत करीत आहे.

१. शेतकरी व शेतमजुरांची शेतीविषयक कामे
२. शेती /कृषी उत्पादनाची खरेदी विषयक कामे
३. मंडी/ बाजार समित्यांची कृषी विषयक कामे
४. पीक पेरणी संबंधाने यंत्राच्या हालचाली.
५. कृषी यंत्रांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक कामे, दुकाने इत्यादी.

Scanned with CamScanner

तसेच उपरोक्त् कामे पार पाडताना कोविड १९ या विषाणू संसर्गाविषयी आवश्यक ती काळजी घ्यावी. तसेच SOCIAL DISTANCING चे निर्देश पाळावेत आणि आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

प्रस्तुत आदेशाचा भंग करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथरोग प्रतिबंधत कायद्या तसेच भारतीय दंड संहिता कलम १८८ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

सदरचे आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी नांदेड.
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७) जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) नांदेड
८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपंचायत, जि.नांदेड
९) सर्व संबंधीत विभाग प्रमुख नांदेड जिल्हा

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

जिल्हादंडाधिकारी, नांदेड

Scanned with CamScanner